जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणीस मुदतवाढ देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## मृद व जलसंधारण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जलअ - २०१४/प्र.क्र.२०३/जल-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**तारीख: ०१ मार्च, २०१९**

**वाचा-**

**१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक : जलअ-२०१४/ प्र.क्र.२०३/ जल-७ दिनांक ५ डिसेंबर,२०१४.**

**२) मृद व जलसंधारण विभाग क्रमांक : बैठक - २०१८ / प्र.क्र.२०६ /जल-७ दिनांक १९ डिसेंबर २०१८ चे पत्र.**

**प्रस्तावना:**

सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र - २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यात शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत मृद व जलसंधारण कामांची सुरुवात पावसाळा संपल्यानंतर सुरु करण्यात येते. तसेच जमीन पिकाखाली असल्याने कामे सुरु करण्यास उशीर होतो. सबब जलयुक्त शिवार अभियान मध्ये निवडण्यात आलेल्या सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८ अभियान वर्षामधील गावांतील कामे पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये निवडण्यात आलेल्या गावातील कामे पुर्ण करण्यासाठी मार्च २०१९ नंतर अधिकच्या कालावधीची आवश्यकता लागणार आहे. ही बाब विचारात घेवून मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत शक्ती प्रदत्त समितीने सन २०१८-१९ मध्ये निवडण्यात आलेल्या गावामधील कामे पुर्ण करण्यास किमान डिसेंबर २०१९ पर्यंत मुदत देण्यास मान्यता दिलेली आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर जलयुक्त शिवार अभियानाचा अंमलबजावणी कालावधी निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

जलयुक्त शिवार अभियानाच्या संदर्भाधीन दिनांक ०५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयात जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणी कालावधी सन २०१९ पर्यंत नमूद आहे. तरी आता या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणी कालावधी माहे डिसेंबर २०१९ पर्यंत निश्चित करण्यात येत आहे. व सन २०१८-१९ मध्ये निवडण्यात आलेल्या गावामधील कामे पुर्ण करण्यास माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत मुदतवाढ या शासन निर्णयाद्वारे देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०१११३६५५६७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2019.03.01 15:10:46 +05'30'

**(सुरेश.द.नाईक)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१०.सर्व विभागीय आयुक्त.
११.संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे
१४.संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१५.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१७.सर्व जिल्हाधिकारी.
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१९.महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).

२०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२१.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

२२.सर्व उपायुक्त (विकास) ,विभागीय आयुक्त कार्यालय,

२३.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

२४.सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी/अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,

२५.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.

२६.सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघु सिंचन (जलसंधारण) व जिल्हा परिषद जलसंपदा.

२७.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२८. सर्व मंत्रालयीन विभाग

२९.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, मृद व ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.

३०.नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

३१.जल-७, निवड नस्ती.